मानवी अवयव प्रतिरोपण
अधिनियम,१९९४
अन्वये राज्य स्तरावर
उच्चाधिकार समितीची स्थापना

17 JUL 1999

**महाराष्ट्र शासन,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्र.एसीटी १०९९/प्र.क्र.१७१/९९/अधिनियम,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : ९ जुलै,१९९९.**

## निर्णय :-

केंद्र शासनाने **मानवी अवयवांचे प्रतिरोपण अधिनियम, १९९४** हा अधिनियम जुलै,१९९४ मध्ये मंजूर केला. सदरचा अधिनियम दि.४ फेब्रुवारी,१९९५ पासून महाराष्ट्र राज्यात लागू केला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने संचालक,आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना महाराष्ट्र राज्यात या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी **समुचित प्राधिकरण** म्हणून क्रमांकःएसीटी १०९५/सीआर १८/९५/अधिनियम, दिनांक २३ मार्च,१९९५ च्या अधिसूचनेन्वये नियुक्त करण्यात आले आहे.

२. सदर अधिनियमातील कलम १३ (३) मधील तरतुदीनुसार समुचित प्राधिकरणाची कामे खालील प्रमाणे आहेत :-

१) वैद्यकीय संस्थांच्या नोंदणीस किंवा नुतनीकरणास मान्यता देणे.
२) प्रतिरोपणाचा दर्जा आवश्यक त्या नोंदी योग्य प्रकारे ठेवल्या जातात किंवा नाही यासाठी नोंदणीकृत रुग्णालयांची तपासणी करणे.
३) या अधिनियमाच्या कोणत्या उपबंधांना किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्या नियमांचा भंग झाल्याबद्दल करण्यात आलेल्या तक्रारींची चौकशी करणे व योग्य ती कार्यवाही करणे.
४) कोणताही मानवी अवयव काढून घेणे, तो जतन करणे किंवा त्याचे प्रतिरोपण करणा-या रुग्णालयांना मानके लागू करणे.
५) वेळोवेळी विहीत करण्यात येतील अशा उपाय योजना करणे.

...२

मा- सहसंचालक (वै) यांचे ... अवलोकनार्थ

या अधिनियमाच्या कलम ९(४)(ब) खालील तरतुदीनुसार या अधिनियमाची प्रयोजने राज्यात पार पाडण्याकरिता प्राधिकार देणा-या समितीची स्थापना शासन अधिसूचना क्रमांकःएसीटी १०९५/सीआर १८/९५/अधिनियम, दिनांक २९ मार्च,१९९५ अन्वये करण्यात आली आहे :-

| | |
|---|---|
| १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,महाराष्ट्र राज्य,मुंबई | अध्यक्ष |
| २) संचालक, आरोग्य सेवा,महाराष्ट्र राज्य,मुंबई | सदस्य |
| ३) अधिष्ठाता,ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय,मुंबई. | सदस्य |

अधिनियमाच्या तरतुदीनुसार मानवी उपचारांच्या प्रयोजनासाठी मानवी अवयव काढणे व त्यांचे प्रतिरोपण करणे या संबंधात या अधिनियमात ज्या तरतुदी आहेत त्या सर्व तरतुदींचे पालन हे अवयव दान करणारी व्यक्ती व ज्याच्यावर अवयव रोपण करावयाची ती व्यक्ती यांनी केलेले आहे, य( विषयीची खात्री करुन घेतल्यानंतर अर्जदारांना मानवी अवयव काढून त्याचे प्रतिरोपण करण्याची मान्यता या समितीमार्फत केली जाते.

३. सद्यःस्थितीत राज्यात मुत्रपिंड रोपणाच्या जास्तीत जास्त शस्त्रक्रिया करण्यात येतात. यातील बहुतांशी शस्त्रक्रिया या जिवंत व्यक्तींद्वारे मुत्रपिंडदान केल्यानंतर करण्यात येतात. त्यासाठी एका निरोगी व्यक्तीस नाहक शस्त्रक्रियेस सामोरे जाऊन एक मूत्रपिंडदान करावे लागते. यासाठी **मस्तिष्क स्तंभ** मृत व्यक्तीचे मूत्रपिंड व अन्य **अवयव दान** कार्यक्रमास अधिक चालना देण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता. त्यासाठी अवयव रोपणास तज्ञ डॉक्टरांची समिती यासाठी नेमण्यात आली होती.या समितीने **मस्तिष्क स्तंभ** मृत व्यक्तीचे अवयव काढणे,जतन करणे , प्रतिक्षा यादीवरील पात्र लाभार्थीस ती नोंदणीकृत रुग्णालयांना उपलब्ध होणे यासाठी अशी रुग्णालये असणा-या मोठया शहरांचे ठिकाणी **विभागीय समन्वय केंद्र (Zonal Co-ordination Centre)** राज्य स्तरावर **महाराष्ट्र कॉन्फेरेशन ऑफ ऑर्गन ट्रान्सप्लान्ट समिती** स्थापण्याची शिफारस केली आहे. दि.५ जून,१९९९ रोजी झालेल्या बैठकीत कॅडेव्हर किडनी ट्रान्सप्लान्टेशनच्या बाबतीत येणा-या समस्याबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी व या संबंधीचे नियम विहित करण्यासाठी एक उप समिती व कॅडेव्हर ऑर्गन ट्रान्सप्लान्टेशन या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सचिव स्तरावरील एक समिती स्थापन करावी असे ठरले. त्याप्रमाणे या शासन निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे सचिव स्तरावरील समिती गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. | सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मुंबई | अध्यक्ष |
| २. | सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | अतिरिक्त आयुक्त,अन्न व औषध प्रशासन,मुंबई | सदस्य |

...3

| | | |
|---|---|---|
| ५. | अति.आयुक्त (आरोग्य),बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ६. | संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई | सदस्य |
| ७. | अधिष्ठाता, जे.जे.रुग्णालय,मुंबई | सदस्य |
| ८. | डॉ.(श्रीमती) वत्सला त्रिवेदी, प्राध्यापक,युरोलॉजी विभाग,सायन हॉस्पीटल | सदस्य |
| ९. | डॉ.(श्रीमती) विद्या आचार्य, अध्यक्ष नॅशनल किडनी फाउंडेशन | सदस्य |
| १०. | कर्नल सतनामसिंग, कार्यकारी संचालक,नॅशनल किडनी फॉऊंडेशन | सदस्य |
| ११. | डॉ.राजिंदर व्यास,नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड | सदस्य |
| १२. | डॉ.सुरेंद्र माथुर,लिव्ह ट्रान्सप्लांट सर्जन,बॉम्बे रुग्णालय,मुंबई | सदस्य |
| १३. | श्रीमती हर्षा देशमुख,नर्मदा किडनी फाऊंडेशनच्या वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्या. | सदस्य |
| १४. | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य सचिव |

४. तसेच मृत व्यक्तींचे अवयव प्रत्यारोपण करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक नियमावली तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे एक उपसमिती नेमण्यात यावी व त्या समितीला **मसुदा समिती (ड्राफ्ट कमिटी)** संबोधण्यात यावे. याप्रमाणे ही उपसमिती खालीलप्रमाणे गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे :-

| | |
|---|---|
| १. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई | अध्यक्ष |
| २. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | सदस्य |
| ३. उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मुंबई | सदस्य |
| ४. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. सहाय्यक संचालक ,आरोग्य सेवा, (होट्य) | सदस्य सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( शि.चि.मोरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई
अतिरिक्तआयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई.
अति:आयुक्त (आरोग्य) बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वै.शि.व संशोधन,मुंबई
अधिष्ठाता, जे.जे.रुग्णालय, मुंबई
~~संचालक, वै.शि.व संशोधन,बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई~~
डॉ.(श्रीमती) वत्सला त्रिवेदी, प्राध्यापक, युरोलॉजी विभाग, सायन हॉस्पिटल, मुंबई
डॉ.(श्रीमती) विद्या आचार्य, अध्यक्ष, नॅशनल किडनी फाँऊंडेशन,मुंबई.
कर्नल सतनामसिंग, कार्यकारी संचालक, नॅशनल किडनी फाँऊंडेशन,मुंबई
डॉ.राजिंदर व्यास, नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड.
डॉ.सुरेंद्र माथुर ,लिव्ह ट्रान्सप्लांट सर्जन,बॉम्बे हॉस्पिटल,मुंबई
श्रीमती हर्षा देशमुख,नर्मदा किडनी फॉऊंडेशनच्या वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्या.
उप सचिव, वै.शि.व औ.द्र.वि.,मुंबई
उप सचिव, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई
सहाय्यक संचालक ,आरोग्य सेवा, (माअप्र)
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.

---x---